# काव्य क्षितिजावरील रंग-पखरण

# क्षितिजरंग

नुकताच प्रकाशित झालेला डॉ. सोमनाथ दत्ता कोमरपंत यांचा क्षितिजरंग हा समीक्षात्मक लेख-संग्रह वाचनात आला. बऱ्याच कालावधीनंतर एक दर्जेदार पुस्तक गोमंतकीय काव्य-रसिकांसमोर गोमंतकीय लेखकाकडून सादर होत आहे, हे विशेष! यासाठी गोमंतक मराठी अकादमीचे खास अभिनंदन करायला हवे.

अलगद उमलणाऱ्या कपासफुला सारखेच या संग्रहाचे स्वरुप आहे. साधा पण सुरेख, डौलदार तसेच उपयोगी असेच याचे वर्णन करावे लागेल. सुटसुटीत नेटकी भाषा, सौंदर्यशोधक दृष्टी आणि चिकित्सक वृत्ती या तिहींचा या लेखांमध्ये एक मनोहारी मिलाफ झालेला आढळतो. एक समीक्षक म्हणूनच नव्हे तर एक हळुवार काव्यात्म व्यक्तिमत्त्व म्हणूनही लेखक आपल्या कृतीत भेटतो हे या लेख-संग्रहाचे अवश्य नमूद करण्याजोगे वैशिष्ट्य.

लेखकाने प्रास्ताविकात सांगितल्याप्रमाणे अध्ययन-अध्यापनाच्या गरजेतून किंबहुना ओढीतून या लेखांचा जन्मसंस्कार झाल्याचे जाणवते. याचाच परीपाक म्हणून की काय या कृतीत क्लिष्ट, शिष्ट आणि अनिष्ट अशा पाखंडी पांडित्य-प्रदर्शनाचा पूर्णतया अभाव दिसून येतो. सबब महाविद्यालयीन तसेच विश्वविद्यालयीन पातळीवरील विद्यार्थ्याला हे लेख जेवढे जवळचे वाटतील तेवढेच ते एखाद्या काव्यप्रिय सुहृदाला किंवा मराठी काव्यसंपदेच्या अभ्यासकालाही जिव्हाळ्याचे वाटतील. हेच या लेख त्रयोदशीचे सुयश म्हणायला हरकत नसावी.

'ज्ञानेश्वरीतील काव्यदर्शन' या मनोज्ञ लेखाने सुरू होणारी ही लेखशृंखला मराठी कवितेची ठळक आणि मोहक स्थित्यंतरे न्याहाळत प्रा. मयेकरांच्या 'स्वप्नमेघ'पर्यंत येऊन थांबते. ओघवती शैली आणि औचित्यपूर्ण भाषेला विचारशक्ती आणि कल्पनाविलासाची जोड मिळाल्याने लेखक सर्व थरातील कविता-प्रेमिकांना जवळून स्पर्शण्याची किमया या लेखांद्वारे साधू शकला आहे. लघुस्वरूप, आशयघनता आणि माधुर्य




हे या संग्रहाचे लेणे आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. उलट प्रत्येक लेख या मताची जणू ग्वाहीच देईल.

ज्ञानेश्वरीसारख्या मराठी वाचकाच्या प्रेयस काव्यग्रंथाला लेखक जितक्या संवेदनशील आणि सूक्ष्म कविमनाने निरखतो तितक्याच बुद्धिनिष्ठ आणि प्रगल्भ दृष्टीने केशवसुतांच्या क्रांतिकारी, परिवर्तनशील कवितेशी तो सुसंवाद साधू शकतो. केशवसुतांच्या कवितेबद्दल लिहिताना लेखक चालू शतमानाच्या सुरुवातीपासून मराठी कवितेच्या तेजस्वी पुरोगामी व ध्येयनिष्ठ वाटचालीचा जणु मांडतो. यापुढील मराठी कवितेचा महत्वाचा टप्पा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजाभिमुख, प्रगतीशील आणि प्रयोगक्षम काव्यरचना. या काळाचा विषयनिष्ठ आढावा लेखकाने 'रविकिरण मंडळ आणि मराठी कविता' या लेखात घेतला आहे. तटस्थ पण समंजस भूमिकेतून गांधी-युगांतील मराठी कवितेचे सामर्थ्य आणि मर्यादा यांचे मूल्यांकन लेखकाने इथे केले आहे. इथूनच तो हलकेच आपले नाते कुसुमाग्रजांच्या ओजस्वी, उत्कट आणि चिंतनशील कवितेशी जोडतो. या मंत्रमुग्ध करणाऱ्या अमोघ प्रतिअनुभूतितून वाचकाला जाग येते ती थेट बोरकरांच्या 'स्वप्नगरींत' इथल्या संवेदनशील आणि चैतन्यमय काव्यविष्कारांतून पल्लवित झालेल्या वाचकाच्या चित्तवृत्ती, बोरकरांच्या निसर्गकवितेच्या आस्वादाने अधिकच प्रफुल्लीत होतात.

म्हणूनच की काय 'इंदिरा संतांच्या कवितेतील भावधारा' वाचकाला अधिकच उत्कटपणे भावतात. लेखकाने विलक्षण संवेदनशीलतेने इंदिरा संतांच्या कवितेतली चिरवेदना आणि आत्मप्रत्यय यांचे हळुवार दर्शन घडविले आहे. यानंतर वाचकाची भेट होते स्वातंत्र्योत्तर काळातील दमदार प्रामाणिक अन् आक्रमक कवितेशी. मराठी कवितेचा हा पडाव परत एकदा एका क्रांतिकारी वळणावर पडल्याचे जाणवते. नारायण सुर्व्यांची मानिनी कविता या वळणाचे प्रतिनिधित्व या लेख शृंखलेत करते. या वास्तवाभिमुख नवसृजनोन्मुख, मूर्तिभंजक कवितेशी भीडताना ती विलक्षण प्रत्ययकारी वाटते.

पुढच्या लेखांतून वाचकाला समकालीन मराठी कवितेचे ओझरते दर्शन घडते. समकालीन कवितेतल्या अनुभव विश्वात वाचकाला भागीदार करताना लेखक आधार घेतो शंकर रामाणी आणि श्रीधर शनवारे यांच्या प्रतिमासृष्टीचा. रामाणींच्या कवितेतला जाणीव नेणीवेचा ऊनपावशी खेळ तसेच शनवाऱ्यांचे सौंदर्यासक्त पण जीवनजाण ठेवणारं कविताविश्व न्याहाळताना वाचक क्षणभर भान विसरतो. पण लेखक हलकेच त्याला वसंत सावंताच्या निसर्गानुभवी कवितेकडे वळवतो. निसर्गाशी पूर्णतः तादात्म्य पावलेली ही विविधरुपी कविता केवळ ओढ लावून थांबत नाही, ती वाचकाला अल्लाद मयेकरांच्या आनंदविभोर स्वप्नमेघाखालींच जणू दाखल करते. प्रेमानुभवांत चिंब भिजलेली ही कविता अद्वैत आणि आर्तता यांचा साज लेऊन आपल्याला भेटते.

पण या काव्य दलांत स्वैर संचार करतानाही वाचकरुपी भ्रमराला एका भावनेचं भान रहाते. हा कमलगंध त्याच्यापर्यंत पोचवण्याचं श्रेय मात्र या कोमल, काव्यासक्त पण चोखंदळ लेख लहरींचे आहे. अवघ्या शब्दात या लेखसंग्रहाचे वर्णन करायचे झाले तर 'काव्यलोमस वृत्तीतून विशुद्ध सौंदर्यशोधन करणारी एक विनम्र कृती' असेच करावे लागेल. यात या कृतीचे सार दडलेले आहेच पण शिवाय डॉ. कोमरपंतांचे खास वैशिष्ट्यही सामावलेले आहे असे वाटते.

**- किरण बुडकुले**